मा. अध्यक्ष महोदय, व सन्मा. सभागृह,

मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब यांच्या कुशल नेतृत्वाखाली वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लोकनियुक्त लोकप्रतिनिधींनी तयार केलेला हा तिसरा अर्थसंकल्प सादर करण्याचा बहुमान मला मिळाला याबद्दल मी त्यांचा व आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. महानगरपालिकेच्या कामकाजासाठी आपले आदरणिय लोकनेते, प्रथम महापौर व इतर सन्मा. पदाधिकाऱ्यांसह वारंवार दिलेल्या भेटींमध्ये मा. ना. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, मा.ना. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब, विधानपरिषदेचे उपसभापती मा. ना. श्री. वसंतरावजी डावखरे साहेब, पालकमंत्री मा. ना. श्री. गणेशजी नाईक साहेब, मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. निरंजनजी डावखरे साहेब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आजी माजी आयुक्त, यांच्या वेळोवेळीच्या सदिच्छा व मार्गदर्शन आपल्या पाठीशी सदैव राहीले आहे. बहुजनांचा विचार करुन बहुजनांच्या हितासाठी असलेला बहुजनांचाच हा अर्थसंकल्प सादर करताना आदरणिय लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. महापौर श्री. नारायणजी मानकर साहेब, मा. प्रथम महापौर श्री. राजीवजी पाटील साहेब, मा. प्रथम उपमहापौर श्री. सगिरजी डांगे साहेब, मा. उपमहापौर श्री. रुपेशजी जाधव साहेब, मा. सभागृह नेते श्री. उमेशजी नाईक साहेब, यांचे नियमित विशेष मार्गदर्शन तसेच सर्व प्रभाग समित्यांचे सभापती सर्व पदाधिकारी यांनी मला वेळोवेळी भेटुन केलेल्या मौलीक सुचना यासर्वांचे प्रतीबिंब या अर्थसंकल्पात आहे. मा. विरोधी पक्षनेत्यांसह, सर्व सन्मा. गटनेते व सदस्यांकडून तसेच सर्व सन्मा. नागरीकांकडून देखील त्यांचे विचार व अपेक्षा आणि कल्पना जाणून घेण्याचा आम्ही यथोचित प्रयत्न केला असुन त्याबाबीदेखील या अर्थसंकल्पात विचारात घेतल्या आहेत. सन्मा. महापौर श्री. नारायणजी मानकर साहेब यांनी स्थायी समिती सभापती पद भुषवीत असताना ३० नोव्हेंबर २०१२ रोजी काढलेल्या परिपत्रकाद्वारे सर्व सन्मा. सदस्यांना अर्थसंकल्पा

संदर्भाने सुचना, कल्पना, प्रस्ताव सादर करण्याची लेखी विनंती केली होती, त्याद्वारे प्राप्त सुचनांचादेखील या अर्थसंकल्पात विचार करण्यात आला आहे. तिसरी मुंबई म्हणून नावारुपाला येत असलेल्या आपल्या महानगरात, मुंबईसह अन्य, विकसीत महानगरात कामधंद्यानिमीत्त रोज ये - जा करणारे अनेक मान्यवर नागरीक वास्तव्य करीत आहेत. त्यामुळे या आधीच विकसीत झालेल्या महानगरातील सोयीसुविधांची तुलना नकळतपणे आपल्या महानगराशी केली जाणे स्वाभाविक आहे. जनतेच्या या भावनांचा विचार करुन आपल्या महानगराच्या विकासाचा प्रगल्भ दृष्टीकोन ठेवणारे आपले लोकनेते मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब हे आम्हाला वेळोवळी मार्गदर्शन करीत आहेत. त्यांच्या द्रेष्टेपणाचे प्रतिबींब या अर्थसकल्पात जागोजागी उमटले आहे. याचा आम्हास अभिमान आहे.

मा. स्थायी समिती सभापती म्हणून कामकाजाच्या सुरुवातीलाच अर्थसंकल्प तयार करण्याची संधी प्राप्त झाल्याने गतवर्षाच्या प्रत्यक्ष जमा खर्चाचा आढावा व आपले मागील अनुभव, निश्चित उत्पन्नाचे मार्ग, भविष्यकालीन विकास योजना, मुलभूत व पायाभूत गरजा, महानगरातील सर्व समाज घटकांच्या महानगरपालिकेकडून असलेल्या वाढत्या अपेक्षा याबाबींचा विचार करुन सर्व समावेशक व लोकाभिमुख असा अर्थसंकल्प मा. स्थायी समितीने आपणापुढे सादर केला आहे.

महानगरपालिकेची संगणकीय नागरी सुविधा केंद्रे यशस्वीपणे सुरु होत असुन बँकामध्ये कर भरण्याची उपलब्ध सुविधा, आगाऊ कर भरणेस प्रवृत्त करण्यासाठी १०% सवलत देण्याचा महानगरपालिकेचा निर्णय, स्थानिक संस्था करासह मालमत्ता कराचेदेखील इतर महानगरांच्या तुलनेत असलेले न्यूनतम दर, महानगरपालिकेत समाविष्ठ भुतपूर्व ग्रामपंचायत क्षेत्रात सद्यस्थितीत असलेल्या पुर्वीच्या मालमत्तांवर तसेच महानगरपालिकेत समाविष्ट भुतपूर्व ग्रामपंचायत क्षेत्रातील रहीवाशांनी स्वत:च्या निवासी वापरासाठी नविन बांधकाम केल्यास देखील पुर्वीच्याच प्रचलित दराने कर आकारणी करणेचा महानगरपालिकेचा निर्णय व इतका अल्प कर भरावा लागत असतानादेखील उपभोगता येणाऱ्या सोयी - सुविधा या बाबींमुळे करदात्यांना कर भरण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे अपेक्षित स्वनिधी (उत्पन्न) प्राप्त होणार आहे. मा. ना. श्री. वसंतरावजी डावखरे साहेब, मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब यांच्या विकास निधीतून भरीव अनुदाने प्राप्त होत आहेत. आपले

लोकनेते मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब व मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब यांच्या विशेष प्रयत्नामुळे प्राप्त होत असलेली इतर भरीव विशेष अनुदाने यामुळे पुरेसा निधी उपलब्ध होत आहे. या बाबींचा विचार करता सन २०१३-१४ मधील अपेक्षित जमा रकमांचा इष्टांक निश्चितपणे पुर्ण होईल असा मा. स्थायी समितीस विश्वास आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेने दिलेल्या प्रशासकिय मान्यतेनुसार सुरु असलेली व होणार असलेली कामे, सन २०१३-१४ मध्ये हाती घ्यावयाच्या अनेक कामांबाबत फेब्रुवारी, २०१३, पासूनच सुरु झालेली प्रशासकिय मान्यता देण्याची व अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही, व काटेकोर अंमलबजावणी कामी नियोजीत उपाय योजना या सर्व बाबींचा विचार करता अपेक्षित कामे मुदतीत पुर्ण होणार असल्याने आपणा सर्वांच्या सहकार्याने उपलब्ध निधीचा सुयोग्य विनीयोग १००% होईल याचा मा. स्थायी समितीस विश्वास आहे.

मा. स्थायी समितीने सादर केलेला अपेक्षित जमा व अपेक्षित खर्च हा वास्तववादी व सर्व समाज घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करणारा आहे, हे मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

अर्थसंकल्पातील महत्वाच्या खालील तरतुदींचा उल्लेख मी करु इच्छितो,

## ★ ठळक जमा बाबी ★

१) स्वत:चे उत्पन्न स्त्रोतामध्ये मालमत्ता कर, स्थानिक संस्था कर, पाणीपट्टी, जाहिरात कर, सिनेमा कर, अग्निशमन उपकर, इमारत भाडे गाळा भुईभाडे, मोकळ्या बिनशेती जमिनीवरील कर, मोबाईल टॉवर्सवरील कर, स्वच्छता सेवा उत्पन्न, फायर प्रोटेक्शन व विशेष फायर प्राटेक्शन फी, बाजार फी, गाळे व मालमत्ता हस्तातरण फी, नळ जोडणी फी, इतर दाखले फी, नगररचना उत्पन्न, पे & पार्क व्यवस्था, नो पार्किगमधील वाहने उचलण्याचे प्रशासकिय शुल्क, तलाव उत्पन्न, रस्ता खोदाई शुल्क, नळ जोडणी आकार, शिक्षण कर, रोजगार हमी कर रिबेट, गुंतवणुकीवरील व्याज, या बाबींचा समावेश असुन याद्वारे ₹ ६६८ कोटी ४१ लक्ष इतका स्वनिधी अपेक्षित आहे.

२) रस्ते अनुदान, मुद्रांक शुल्क अनुदान, वित्त आयोग अनुदान, एम. एम. आर. डी. ए. कडील अनुदान, आमदार निधी, खासदार निधी, एकात्मीक तलाव संवर्धन योजना अनुदान, दलीत वस्ती सुधारणा योजना अनुदान, वैशिष्ट्यपुर्ण कामे अनुदान, जमिन

महसुल अनुदान, करमणूक कर अनुदान, या अनुदानांसह मत्स्य विकास महामंडळाचे अनुदान, सॅटेलाईट सिटी योजना अनुदान, अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास अनुदान, आपत्कालीन व्यवस्थापन अनुदान, नव्यानेच प्रथमत: प्राप्त होत असलेले सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अनुदान, इत्यादी बाबींपासून ₹ ३७४ कोटी ०६ लक्ष अनुदान अपेक्षित आहे.

३) प्रारंभिक शिल्लक ₹ ४५० कोटी ९८ लक्ष अपेक्षीत आहे.

४) इतर जमा ₹ १८५ कोटी ६२ लक्ष अपेक्षीत आहे.

मा. स्थायी समितीने बाबनिहाय सविस्तर चर्चा करुन वरीलप्रमाणे एकूण जमा ₹ १६७८ कोटी ६८ लक्ष इतके उद्दिष्ट निश्चित केले आहे.

## ★ ठळक खर्च बाबी ★

अ) वेतन भत्ते व इतर आस्थापना खर्च ₹ १०३ कोटी ६८ लक्ष आहे.

ब) बांधील खर्च ₹ १३० कोटी ८६ लक्ष आहे.

क) इतर आवश्यक खर्च, देखभाल दुरूस्ती विद्युत देयके, साफसफाई, आरोग्य, इत्यादी बाबींवरील इतर आवश्यक खर्च ₹ २१९ कोटी ३७ लक्ष आहे.

ड) विकास कामांवरील खर्च ₹ ९८१ कोटी ६२ लक्ष आहे.

इ) इतर खर्च ₹ २३० कोटी २० लक्ष आहे.

अशाप्रकारे एकूण खर्च ₹ १६६५ कोटी ७३ लक्ष आहे. अखेर शिल्लक ₹ १२ कोटी ८३ लक्ष आहे.

१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत ₹ ३५० कोटी खर्चाच्या १०० एम. एल.डी विस्तारीत पाणीपुरवठा योजनेसाठी प्रथम टप्प्यात ₹ ७५ कोटी अनुदानासह ₹ १५५ कोटीची तरतुद आहे. सुसरी धरणासाठी ₹ १६ कोटी इतकी रक्कम सरकार जमा केली आहे. कवडास धरणाची उंची वाढवून गेट बांधून प्रतिदिन ७० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होऊ शकेल. ३५ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करणारे राजीवली सातीवली धरण, प्रतिदिन ६५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करणारे कामण धरण, प्रतिदिन ३५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करणारे खोलसापाडा धरण तसेच धामणी, खडकवली धरणावरील योजना याबाबत पाठपुरावा करून प्रतिदिन ३०० दशलक्ष लिटर पाणी कर्ज निधीतून उपलब्ध करण्यासाठी आवश्यक तरतूद आहे.

नविन पाणीपुरवठा योजनेसाठी ₹ १४ कोटी २६ लक्ष कर्ज परतफेड व ₹ ९० कोटी महानगरपालिकेचा खर्चातील हिस्सा अशी ₹ १०४ कोटी २६ लक्ष तरतुद

स्वनिधीतून आहे. पाणीपुरवठा सेवेसाठी एकूण ₹ २७५ कोटी ६ लक्ष इतकी एकूण तरतूद केली आहे.

२) ₹. ८०० कोटी खर्चाच्या महत्वाकांक्षी रिंगरोडसह एकात्मिक परिवहन व दळण - वळण सुविधा प्रकल्पासाठी कर्ज परतफेडीकरीता ₹ १२ कोटी २० लक्ष व महानगपालिकेच्या खर्चातील हिश्यासाठी ₹ २२ कोटी अशी एकूण ₹ ३४ कोटी २० लक्ष स्वनिधीची तरतुद प्रथम टप्प्यात आहे.

३) रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी रस्ता बांधकामाकरीता ₹ १२० कोटी ४३ लक्ष व रस्ते दुरुस्तीसाठी ₹ २२ कोटी ६५ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

४) गटार व नाले बांधकामासाठी ₹ ४२ कोटी ६८ लक्ष गटार व नाले दुरूस्तीसाठी ₹ १२ कोटी १६ लक्ष व चेंबर्स बसविणेकामी ₹ ६ कोटी अशी एकूण ₹ ६० कोटी ८४ लक्ष इतकी तरतुद स्वनिधीतून आहे. याव्यतीरिक्त भुमीगत गटार व्यवस्थेसाठी सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत भरीव तरतुद केली आहे.

५) महानगरपालिकेची परिवहन सेवा यशस्वीपणे सुरु झाली असुन कोणत्याही प्रकारच्या भांडवली खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर पडलेला नाही. नजिकचे काळात संपुर्ण शहरात आवश्यक त्या सर्व मार्गिकांवर परिवहन सेवा सुरू होणार असून ऐतिहासीक, सांस्कृतीक वारसा लाभलेल्या आपल्या या महानगराचे दर्शन घडवणारी पर्यटकांचे आकर्षण ठरेल अशी वसई दर्शन बससेवा देखील सुरू करण्याचा इरादा आहे. प्रायोगिक तत्वावर, काही मार्गिका निश्चित करुन मोफत परिवहन सेवा सुरु करण्याचाही मानस आहे. याकामी ₹ ४ कोटी इतकी प्राथमिक तरतुद केली आहे.

६) महिला, बालके, युवक, यांना केंद्रस्थानी ठेवून विविध योजना अमलात येणार आहेत. युवकांच्या रोजगार उपलब्धतेसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा लाभ मिळवून देणे, स्थानिक कामगार मजूर सहकारी संस्थांना, सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना ₹ १५ लक्ष रकमेपर्यतची कामे मिळवून देणे, व्यवसाय प्रशिक्षण आयोजीत करून महिलांना उत्पन्न साधन उपलब्ध करून देणे, बालवाडी तसेच प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपकरणे, वहया पुस्तके व खेळणी खरेदी, शाळांच्या आवश्यकतेनुसार संगणक पुरविणे, विशेष बालकांसाठी साहित्य पुरविणे व विशेष बालकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, बालकट्टा, शिलाई मशिन पुरवठा, शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी मोफत शैक्षणिक पास योजना, नागरी गरीब विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी सायकली वाटप, शालेय विद्यार्थ्यांसाठी साहस शिबिरासह विविध उपक्रम, नोकरदार महिलांसाठी वसतीगृह, निराधार महिलांसाठी तात्पुरता निवारा केंद्र व जेंष्ठ महिलांसाठी वृद्धाश्रम

निर्मीती व त्यांचेसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य देणे, आरोग्य शिबीर व व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम, नोकरदार व व्यवयाय करणाऱ्या महिलांच्या लहान मुलांचे संगोपन व त्यांची देखभाल करण्याच्या दृष्टीने पाळणाघर निर्मिती व सेवाभावी नोंदणीकृत महिला गटांना पाळणाघर चालविणेसाठी अनुदान देणे, कुटूंबकल्याण कार्यक्रम, कुपोषित माता व बालकांसाठी सकस आहार, बालकांच्या विकासासाठी अन्य कार्यक्रम, महानगरपालिका रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना भोजन भत्ता व अल्पोपहार भत्ता, जननी शिशु सुरक्षा योजनेच्या लाभासह प्रसुत महिलांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर ₹ १६००/- इतका पोषण व आरोग्य भत्ता देणे, स्वयंसेवी संस्थांमार्फत डायलेसिस उपचार घेणाऱ्या मुली व महिलांना अनुदान देणे, बालकांना स्वयंसेवी संस्थांमार्फत दत्तक घेणाऱ्या पालकांना प्रोत्साहनात्मक अनुदान देणे, एड्सने मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या विधवा पत्नीस वैयक्तीक अर्थसहाय्य करणे, विधवा परितक्त्या महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविणे तसेच विधवा परितक्त्या महिलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, महिला सक्षमिकरणासाठी विविध उपक्रम राबविणे, बालचित्रपट महोत्सव, स्त्रीरोग चिकित्सा शिबीर तसेच महिला बालकल्याण समिती मार्फत आयोजीत केल्या जाणाऱ्या इतर योजना व कार्यक्रमांसाठी आणि महीला व बालकल्याण योजनेंतर्गत भांडवली कामे, प्राथमिक व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती परिक्षा व इतर स्पर्धा परिक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर पारितोषिके देणे, महानगरपालिका हद्दीतील शाळेतील सर्व मुली, अनुसुचित जाती व जमातींची मुले, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुले, यांना सायकलींचे वाटप, स्पर्धात्मक युगातील यशस्वीततेसाठी युवक व युवतींकरिता विशेष शैक्षणिक कार्यक्रम, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व दहावीच्या विद्यार्थांसाठी वाचनमाला उपलब्ध करणे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पहिल्या १० विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांकास ₹ १५ हजार, द्वितीय क्रमांकास ₹ १० हजार, तिसऱ्या क्रमांकास ₹ ५ हजार व क्रमांक ४ ते १० यांना प्रत्येकी ₹ २ हजार पारितोषीक देणे, तसेच शासनमान्य राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवरील परिक्षा व स्पर्धा परिक्षामध्ये पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य, प्रभाग स्तरावर विविध ठिकाणी अभ्यासिका निर्माण करण्यासाठी सहाय्य करणाऱ्या संस्थांना व शाळांना अनुदान देणे, विद्युत इनव्हर्टर, पिण्याच्या थंड पाण्याची व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, बैठक व्यवस्था, सी. सी. टी. व्ही, दिवाबत्ती व्यवस्था उपलब्ध करणे व आवश्यकतेनुसार याकामी जागा भाड्याने घेणे, प्रभाग स्तरावर विविध ठिकाणे निश्चित करुन सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत

मुले व मुलींची सेवा भावी डॉक्टरांच्या मदतीने मोफत वैद्यकिय तपासणी करुन गरजुंना मोफत चश्मे वाटप करणे, याबाबींसाठी महिला बालके व युवक कल्याणाकरीता एकूण ₹ १६ कोटी ६७ लक्ष इतकी स्वतंत्र तरतुद केली आहे.

७) जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र व आरोग्य चिकीत्सा शिबीर यासाठी ₹ ८९ लक्ष इतकी तरतुद असुन संस्था अनुदानाअंतर्गत जेष्ठांसाठी कार्यरत नोंदणीकृत संस्थांना अनुदान देण्याची स्वतंत्र तरतुद केली आहे.

८) गरीब गरजूंसाठी मोफत वैद्यकीय शिबीर, रुग्णालयीन सेवेचा खर्च, दलितवस्ती योजना कामे, राजीव आवास योजना कामे, दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी घरकुल योजना, पाण्याचा काटकसरीने वापर व सर्व जलस्त्रोतांचा (पाणवठा) योग्य व पुरेपुर विनियोग करणेसाठी खाजगी नविन विहीरी खोदकामांसाठी अनुदान, शेती कामांसाठी साहित्य, विज पंप, फवारणी पंप, जंतुनाशके बियाणे, खत इत्यादी शेत काम साहित्य पुरवठा, वनराई बंधारा बांधकाम, मच्छीमार, शेतमजूर व बोटीवरील मजूर यांना त्यांचे कर्तव्य परिसरात आरोग्य सुविधा व फिरता दवाखाना उपलब्ध करुन देणे तसेच या क्षेत्रात सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्था अनुदाना अंतर्गत अनुदान देणे. श्रमसाफल्य योजने अंतर्गत सफाई कामगार घरकुल/कामगार निवास बांधकाम इत्यादी बाबींचा समावेश केला आहे. मागासवर्गिय कल्याणकारी योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या योजनांसाठी ५% राखीव तरतूदीसह पी बजेट करीता ₹ ५० कोटी ५९ लक्ष इतकी तरतूद केली आहे.

९) अपंगाकरिता कल्याणकारी योजना :- उपलब्ध स्कायवॉक जवळ अपंगांसाठी, जेष्ठ नागरिकांसाठी, गरोदर महिलांसाठी सरकते जिने व उद्वाहन, विविध महत्वाच्या सार्वजनिक ठिकाणी रॅम्पची व्यवस्था व इतर अपंग कल्याणकारी योजनांच्या भांडवली खर्चासह अंध, अपंग, गतीमंदांचे कल्याणासाठी कार्य करणाऱ्या बोळींज येथील अपंग पुर्नवसन केंद्रासह इतर संस्थांना अनुदान व अंध, अपंग, गतीमंद व्यक्तींना आवश्यक साहित्य पुरविणेकरीता ₹ ४ कोटी ३९ लक्ष इतकी तरतूद केली आहे.

१०) अल्पसंख्यांक कल्याणासाठी ₹ ६० लक्ष इतकी विशेष तरतुद असून दफन भुमी विकासा अंतर्गत नविन दफन भुमींसाठी भुसंपादनासह तसेच अस्तित्वातील दफन भुमींचा विकास करणेकामी ₹ १० कोटी ५० लक्ष इतकी तरतुद केली आहे.

११) क्रीडा विषयक कार्यक्रम : i) प्रभाग समिती निहाय शालेय कलाक्रीडा महोत्सव, वसई तालुका कलाक्रीडा महोत्सव समिती व जिमखाना व्यायामशाळा यांचे संचालन करणाऱ्या संस्थांसह इतर क्रीडा संस्थाना अनुदान देणे, महानगरपालिकेच्या जिमखाना/ व्यायामशाळेचे व्यवस्थापन करणे, महापौर मॅरेथॉन स्पर्धा, खेळ व संघ दत्तक घेणे तरतुदी अंतर्गत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर शासन मान्य स्पर्धांसाठी शालेय

विद्यार्थ्यांचे क्रीडासंघ पाठवणेसाठी प्रायोजकत्व स्विकारणे, यासाठी महानगरपालिकेची क्रीडा समिती नियुक्त करुन खेळाडू, प्रशिक्षक व संघ सदस्यांना लागणारे क्रीडा साहित्य, गणवेश / टी-शर्ट, प्रवास खर्च, व इतर अनुशंगिक खर्चासाठी अर्थसहाय्य मंजुर करणे, वर्ल्ड कप, ऑलिम्पीक, एशियाड, राष्ट्रकूल, व इतर तत्सम स्पर्धांमधे निवड झालेल्या खेळाडूंना अनुक्रमे ₹ ३ लक्ष, ₹ ३ लक्ष, ₹ २ लक्ष व ₹ १ लक्ष इतकी प्रोत्साहन पर रक्कम प्राथमिक खर्चासाठी मदत स्वरुपात अदा करणे, इत्यादी कामी ₹ ७ कोटी ७३ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

ii) नरविर चिमाजी आप्पा मैदान विकासाकरिता ₹ १ कोटी इतकी तरतूद केली आहे.

iii) मा. लोकनेते श्री हितेंद्रजी ठाकूर यांनी विशेष प्रयत्नाने मिळवून दिलेल्या विशेष निधीतून साकारलेल्या विरार येथील ऑलिम्पिक साईजचा जलतरण तलाव येथील उर्वरित अनुषंगीक कामे, वालीव येथील हितेंद्र आप्पा क्रीडांगणाच्या विकासासह संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी व सार्वजनिक मालकीची क्रीडांगणे जमिन मालकांसोबत चर्चा करुन विकसीत करणे यासाठी तसेच फुटबॉल, ॲथलेटिक्स, ट्रॅकिंग, हॉकी, टेनिस, बॉक्सिंग, बॅडमिंटन, क्रिकेटसारख्या खेळांसाठी विशेष योजने खाली महानगरपालिकेच्या मालकीची बंदिस्त व खुली क्रीडांगणे विकसित करणेकरिता आवशक त्या अर्थसंकल्पीय तरतूदी केल्या आहेत.

नविन क्रीडांगणासाठी भूसंपादनासह स्टेडियम बांधकाम व इतर क्रीडांगण विषयक कामांसाठी ₹ ६ कोटी ४० लक्ष इतकी तरतूद केली आहे.

क्रीडा विषयक कार्यक्रमांसाठी ₹ १६ कोटी ८१ लक्ष इतकी एकूण तरतूद केली आहे.

१२) सामुदायिक विवाह सोहळ्या अंतर्गत प्रत्येकी ₹ १० हजार प्रमाणे अनुदान वर अथवा वराचे पालकांना तसेच वधु अथवा वधुचे पालकांना देणेकामी अनुक्रमे युवक कल्याणकारी योजने अंतर्गत व महिला बालकल्याण योजने अंतर्गत तरतूद केली आहे.

१३) बांधकाम व्यवस्था :- बांधकामाच्या महसुली खर्च विषयक बाबी, दुरुस्ती विषयक बाबी, नविन कामे इत्यादी साठी आवशक अर्थसंकल्पीय तरतूदी आहेत. इमारत दुरुस्ती, इतर बांधकामांची दुरुस्ती देखभाल, रस्ते सौदर्यीकरण कॅटआय रिफ्लेक्टर व्यवस्था, सिग्नल व्यवस्था, कामगार निवास दुरुस्ती, विशेष तांत्रिक कामांसाठी तांत्रिक सल्लागारामार्फत बांधकामाचे नियोजन व अंदाजपत्रक तयार करुन नियंत्रण ठेवणे, भुमापन खर्च, संरक्षक भिंत बांधकाम दुरुस्ती, हुतात्मा स्मारके व ऐतिहासिक स्मारक देखभाल, धोबीघाट, सामाजिक संस्थांचे स्वत:चे अथवा

महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक आकाशवाणी केंद्र स्थापन करणे, विकास कामांच्या कर्ज परतफेडीची तरतूद, रोडरोलर व बांधकाम विषयक वाहन खरेदी, इतर नागरी सुविधांसाठी भुसंपादन, कला, संगीत व नाटयक्षेत्रासाठी नवघर माणिकपूर व नालासोपारा येथील नाटयगृह, कला दालन, बंदिस्त करुन नुतनीकरण करणेसह इतर ठिकाणी खुली व बंदिस्त नाटयगृह उपलब्ध करणे, सभागृह बांधकाम, तसेच पदपथ व्यवस्था, सार्वजनिक शौचालय व मुतारी बांधकामे, नालासोपारा येथील बौध्द स्तुपासह इतर ऐतिहासिक मालमत्ता मुल्यवर्धी योजना, भुसंपादीत आरक्षित जागांचा विकास, प्रवाशांसाठी रात्र निवारा गृह उपलब्ध करणे, इतर विकास कामे, शहरविकास प्रकल्प आराखडा तयार करणे, महत्वाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक व स्वागत कमानी, राजीव आवास योजनेंतर्गत महानगरपालिकाच्या क्षेत्रातील चाळी व झोपडपट्टयांचे पुनर्वसन करणे, महापौर निधी अंतर्गत त्यांचे शिफारशी नुसार व प्रभाग समिती स्तरावर प्रभाग समिती निधीतील आवश्यक कामे, वैशिष्टपूर्ण कामे व मुलभूत सुविधा विषयक कामांसाठी प्राप्त विशेष निधीतील कामे, गोव्याच्या धर्तीवर महानगरपालिका क्षेत्रातील समुद्र किनारी हायटाईडपासून १ कि.मी. अंतरावर मेरीटाईम बोर्डाच्या मार्गदर्शन व सहकार्यानुसार चौपाटी विकास, मारंबळपाडा - वसई - भाईंदर अशी जीवसंरक्षक व्यवस्थेसह फेरीबोट सेवा, मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर खाजगी लोक सहभागातून पोर्टची स्थापना करणे यासह मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर यांच्या विनंतीनुसार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत विधान परिषदेचे उपसभापती मा.ना.श्री. वसंतरावजी डावखरे साहेब, व मा. आमदार श्री. निरंजन डावखरे साहेब यांच्या प्राप्त होणाऱ्या तसेच मा. लोकनेत्यांच्याच सुचनेनुसार निधीतील कामे, तसेच त्यांच्याच सुचनेनुसार मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव, मा. आमदार श्री. विलासजी तरे, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर व यांच्या निधीतील कामे, बंदर विकास कामांतर्गत मच्छीमार / कोळी बांधवांसाठी व्यवसाय वृद्धीकरिता शितगृह व्यवस्था, बर्फ कारखाना, मासळी सुकवण्यासाठी चौथराबांधकाम, जेट्टीच्या जोडरस्त्याचे कॉंक्रिटीकरण, उतरता धक्का बांधणे, खारफुटीची जागा संरक्षित करणे, धुप प्रतिबंधक बंधारे व समुद्र किनारी संरक्षक भिंती उभारणे, मासेमारी नौकांचे यांत्रिकीकरण करणे इत्यादी विविध विकासकामांसाठी ₹ ३९७ कोटी ६२ लक्ष इतकी भरीव तरतूद केली आहे.

१४) आस्थापना खर्चासाठी वेतन भत्ते, आयुक्त निवास महापौर निवास, प्रशासकिय

इमारत बांधकाम, नगरभवन व सभागृह, नगररचना, द्विनोंद लेखापद्धती अंमलबजावणी, दिवाबत्ती व्यवस्था, मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणेकामी कोंडवाडा व मादी श्वान निर्बीजीकरणा करीता शेडसह इतर कामे, अग्निशमन व्यवस्था रस्त्यावरील केरकचरा व इतर सार्वजनीक ठिकाणांची घंटागाडी पुरविणेसह साफसफाई व शाळागृहांमध्ये वेळोवेळी औषध फवारणी इत्यादीसाठी ₹ २४५ कोटी ७८ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

१५) रुग्णालय व्यवस्थेवर विशेष भर देण्यात आला असून वसई येथील पेटीट हॉस्पीटलसाठी मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर यांनी निधी दिला होता यामधील हेरीटेजच्या अडचणी दुर करुन काम पुर्ण करणे तसेच नविन रुग्णालयाचे काम पुर्ण करणेसह इतर खर्चासाठी ₹ ३८ कोटी ०४ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

१६) आपत्कालीन केंद्र निर्मीतीसह आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ₹ ९१ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

१७) दहन भूमी व्यवस्थापनासाठी महसुली खर्चाकरीता ₹ २ कोटी १३ लक्ष तसेच नविन दहन भुमी व्यवस्थेसाठी व अस्तित्वातील दहन भुमींचे विकासासाठी ₹ ८ कोटी इतकी तरतुद केली आहे.

१८) बालोद्यान, सर्वसाधारण उद्यान, वनस्पती उद्यान, जॉगर्स पार्क इत्यादीचा विकास करुन खेळणी, क्रीडासाहित्य, म्युजीकल सिस्टीम, इलेक्ट्रीक फिटींग, बैठक व्यवस्था करणेसाठी ₹ ११ कोटी ९२ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

१९) शहरात विविध ठिकाणी मटन मार्केट, भाजी मार्केट, फुल मार्केट, ओली मासळी मार्केट, सुकी मासळी मार्केट, इ. बहुद्देशीय मार्केट विकासासाठी ₹ ४ कोटी ३ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

२०) विरार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तलाव, ॲड. सि. पी. सोलंकी परिक्रमा व नौकाविहार केंद्र तसेच नालासोपारा येथील चक्रेश्वर तलाव, आचोळा तलाव व इतर ठिकाणचे तलाव विकसित करण्यात आलेले असुन याच धर्तीवर एकात्मिक तलाव संवर्धन योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून निर्मळ येथील विमल तलावासह चेन ऑफ लेक नुसार पापडी तलाव, तामतलाव इ. शहरातील उर्वरित विविध तलावांचे पुनर्जिवीतीकरण व सुशोभिकरण करणे, देवदेवतांच्या मुर्तीच्या विसर्जनाची व्यवस्था करणे, निर्माल्य कलश व्यवस्था करणे तसेच महापालिकेच्या तरण तलाव व्यवस्थापन इत्यादी कामी ₹ ३८ कोटी २६ लक्ष इतकी तरतूद केली आहे.

२१) शालेय व्यवस्थापनासाठी ₹ ५ कोटी ९१ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

२२) वाचनालय व्यवस्था :- नवघर माणिकपूर येथे अद्यावत वाचनालय इमारतीचे काम सुरु असून अन्य प्रभागात देखील वाचनालय इमारत बांधकाम प्रस्तावित आहे.

शहरपातळीवर विविध ठिकाणी वाचनालय व अभ्यासिका व्यवस्था उपलब्ध करणे, पुर्वीच्या शहरी विभागातील वाचनालयांचा दर्जा सुधारणे, वाचनालये व अभ्यासिका वर्षभर १२ तास सुरु ठेवणे सदर ठिकाणी सुरक्षीततेच्या दृष्टीने सी.सी. टिव्ही कॅमेरे व वायफाय सेवा उपलब्ध करुन देणे, थंड व शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, सुरक्षा रक्षक व प्रथमोपचार व्यवस्था उपलब्ध करणे, वाळवी प्रतिबंधक किटकनाशके फवारणी करुन व पुस्तके बांधणी करुन पुस्तकांचे जतन करणे संपुर्ण संगणकीकरणा अंती केद्रीय ठिकाणी इ - ग्रथालय सुरु करणे इत्यादी बाबींसाठी ₹ २ कोटी ८५ लक्ष इतकी तरतूद आहे. याशिवाय संस्था अनुदानांतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील ग्रंथालयांना अनुदान देण्याची स्वतंत्र तरतूद केली आहे.

२३) स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, थोर राष्ट्रपुरुषांच्या जयंती इत्यादी कार्यक्रमासह वसई विजयोत्सव, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दिपोत्सव, दिपावली पहाट, दिपावली संध्या, पावसाळी संध्याकाळ, तिळगूळ कार्यक्रम, नाताळ गोठा, इद-ए-मिलाद इत्यादी इतिहास व संस्कृती जोपासना करणारे सर्वधर्मीय कार्यक्रम, सत्कार उत्सव समारंभ, व्याख्यानमाला व वकृत्व स्पर्धा, ग्रंथ संमेलन, गुणवंत शिक्षक सत्कार, विद्यार्थी गुणगौरव, महापौर चषक स्पर्धा, इत्यादी साठी ₹ १ कोटी ६५ लक्ष इतकी तरतूद आहे. सामाजिक आर्थिक सर्व्हेक्षणासह महानगरपालिकेचे सामाजिक आकाशवाणी (कम्युनिटी रेडीओ) केंद्राचे व्यवस्थापन करणेसाठी ₹ १० लक्ष इतक्या महसुली खर्चाची प्राथमिक तरतूद आहे.

२४) संस्था अनुदाने :- संजीवनी रुग्णालय, निराधार व निराश्रीत मुलींसाठी कार्य करणाऱ्या संस्था व इतर विश्वस्त नोंदणीकृत संस्थाचा सामाजिक विकासातील अमुल्य सहभाग विचारात घेता प्रोत्साहन देणेकामी अशा संस्थाना त्यांचे विशेष कार्यासाठी अनुदान देणेकामी तद्वतच विविध वर्गाच्या ग्रंथालयांना अनुदान देणेकामी ₹ ४० लक्ष इतकी तरतूद केली आहे.

२५) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत ₹ ४० लक्ष इतकी तरतूद केली आहे.

२६) उड्डाणपुल व्यवस्था :- नायगाव पुलासाठी ₹ ५ कोटी इतकी खास स्वतंत्र तरतूद असुन विराट नगर, नालासोपारा, नवघर, वसई इत्यादी मंजुर विकास आराखड्यातील विविध अत्यावश्यक ठिकाणी रेल्वे उड्डाणपूल व पुर्व पश्चिम विभागास जोणारे पादचारी पुल इत्यादीसाठी ₹ १५ कोटी ७६ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

२७) पाण्याचा पुनःवापर करणेसाठी उपाययोजना : मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर यांनी दूर दृष्टीने हाती घेऊन पुर्णत्वास नेलेल्या विविध पाणीपुरवठा योजनांमुळे

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात पाण्याचे दुर्भिक्ष टळलेले आहे. भविष्य कालीन योजनांसाठी देखिल त्यांचे विशेष प्रयत्न सातत्याने सुरु आहेत. तथापी पिण्याच्या पाण्या व्यतिरीक्त अन्य प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा पुन:वापर करणे काळाची गरज असून त्यादृष्टीने बांधकाम परवानगी देताना विकासकांनी इमारतीमधे यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याचे बंधन घातले जात आहे. त्याच वेळी सद्यस्थितीत जे मालमत्ता धारक पिण्याच्या पाण्याव्यतिरीक्त अन्य प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा पुन: वापर करण्याची योजना महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या संमतीने अंमलात आणतील त्यांना पाणी पट्टीच्या देयकात २ % सवलत देण्याची तरतूद केली आहे.

२८) रेन वॉटर हार्वेस्टींग योजना : नव्याने विकसित केल्या जाणाऱ्या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टींग योजनेची अंमलबजावणी सक्तीने केली असुन अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना याकामी प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामधे सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ठ असल्याने मालमत्ता कराच्या २% सवलत देण्याची तरतुद केली आहे.

२९) सौर ऊर्जा वापर :- विद्युत ऊर्जेची बचत करुन कार्बनक्रेडीट मिळवण्याचा एक भाग म्हणून महानगरपालिकेकडे प्रथम नोंदणी करुन गृहनिर्माण संस्थाच्या प्रांगणांमधे सौर ऊर्जेवरील दिवे व सोलर वॉटर हिटर चा वापर करण्याऱ्या व्यक्ती / संस्थाना एकत्रित मालमत्ता कराच्या २% सवलत देण्याची तरतूद केली आहे.

३०) निर्सग ऋण प्रकल्प : भाभा अणू संशोधन केंद्र यांनी तयार केलेला निर्सग ऋण प्रकल्प राबवून स्वतःच्या गृह निर्माण संस्थेतील कचरा स्वतःच्या सोसायटीमधेच निर्मूलन करणाऱ्या गृह निर्माण संस्थेस विशेष प्रोत्साहन देणेकामी एकत्रित मालमत्ता करामधे २% सवलत देण्याची तरतूद केली आहे.

म्हणजेच विविध योजना राबविणेसाठी प्रोत्साहन देणेसाठी एकंदर १०% सवलत देणेची तरतुद केली आहे.

३१) मालमत्ता धारकांना विमा संरक्षण : मालमत्ता कराचा भरणा मुदतीत करणेस नागरिकांना प्रोत्साहन देणेसाठी मालमत्ता धारकांच्या मालमत्तांना अपघाती विमा संरक्षण देण्यासाठी ₹ १५ लक्ष इतकी तरतूद केली आहे.

३२) महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील असणाऱ्या नागरीकांना समुह गटविमा योजनेखालील मेडीक्लेम सुविधा प्राप्त करून देण्यासाठी त्याचप्रमाणे शहरातील सर्व नागरीकांना_₹ २५ हजार इतके अपघाती विमा संरक्षण देणेसाठी जनता अपघाती

विमापत्र घेणेकामी ₹ १ कोटी ८९ लक्ष इतकी तरतुद आहे.

३३) पर्यावरण संरक्षण कार्यक्रम :- अ) पर्यावरण अहवाल तयार करणे व तदनुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच कार्बनक्रेडीट मिळवणे हा पर्यावरण संरक्षणाचा एक भाग आहे.

यामधे सी.एफ.एल.दिवे खरेदी व जुन्या दिव्यासोबत प्रति घरटी ₹ १५/- प्रमाणे खर्च अपेक्षित आहे. पर्यावरण संरक्षणासाठी आवशक बाब विचारात घेता प्रथम महापौर यांच्या विशेष पाठपुराव्याने सदर योजना सत्वर मार्गी लागणार आहे. यासाठी ₹ ६१ लक्ष इतकी तरतुद केली आहे.

ब) जिवदानी मंदिर ट्रस्ट व वन खात्याच्या संयुक्त विद्यमाने ५०० हेक्टर जागेत वनीकरण प्रकल्प सुरु आहे. आतापर्यंत १ लाख झाडे लावण्यात आली आहेत. यापुढेही अधिक - अधिक वृक्ष रोपण केले जाणार आहे. हरित पट्टा ही संकल्पना ठराविक क्षेत्राकरिता मर्यादित न ठेवता संपुर्ण वसई तालुका हरित वसई म्हणून नावारुपाला आणणेस महानगरपालिका क्षेत्रात प्रतिवर्षी किमान २० लक्ष वृक्ष लागवड करणेचा महानगरपालिकेचा संकल्प असुन त्या दृष्टीने मोकळी जागा, वाया जाणारे पाणी याचा वापर करुन मासवण, उसगाव, पेल्हार इत्यादी ठिकाणी स्वतःची नर्सरी तयार करुन सर्व सेवा भावी संस्था व नागरिकांना झाडे लावणे त्याचे जतन करणे यासाठी विशेष सहाय्य व प्रोत्साहन देणेसाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी कार्यरत असणाऱ्या मोठयाप्रमाणात वृक्षारोपण करणाऱ्या सामाजिक संस्थाना वृक्षारोपण व संवर्धनासाठी ५०% पर्यंत खर्च देणे व सार्वजनिक ठिकाणी वनखात्यामार्फत वृक्षारोपण व संवर्धन करणेकामी वनखात्याकडे प्रकल्पाप्रमाणे मागणी नुसार खर्चाची रक्कम जमा करुन वृक्षारोपण करण्याचा प्रस्ताव आहे. समाजातील व्यक्ती सस्थांना रोपे देताना दोन ते तीन वर्षाची जगवलेली रोपे दिल्यास त्याचे संगोपन सहज शक्य होते सबब पहिल्या टप्यात सदर रोपे महापालिकेच्या नर्सरीमधे जगवण्याचे काम सुरु आहे. पर्यावरण संरक्षणाचे इतर कार्यक्रम, वृक्ष संरक्षण, वृक्ष गणना, नागरी वनीकरण, झाडांसाठी पिंजरे खरेदी करणे, नागरी वनीकरण योजनेसाठी पाण्याचे टँकर खरेदी, टेकड्यांचा विकास प्रभावीपणे करुन हँगींग गार्डन निर्मितीसह वन्य प्राण्यासाठी अभय अरण्य, सर्पोद्यान, पक्षी उद्यान, वनस्पती उद्यान यासह वृक्ष निधी अंतर्गत इतर भांडवली कामे करणे कामी ₹ १४ कोटी ३८ लक्ष इतकी तरतूद आहे. मत्स्यालय व भुगर्भ उद्यान बी.ओ.टी तत्वावर विकसीत करण्याचे प्रस्तावित आहे.

३४) कत्तलखाना :- महापालिकेचे विस्तृत क्षेत्र विचारात घेता देवनारच्या धर्तीवर अद्यावत सुसज्य कत्तलखाना निर्मिती अत्यंत आवशक आहे. यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्रकल्प आराखडा तयार करण्यापासून प्रत्यक्ष बांधकामासाठी प्रकल्प खर्चाच्या १००% विशेष अनुदान मिळवणेचा प्रयत्न केला जाणार आहे. याकामी ₹ १०० कोटी इतका खर्च अपेक्षित असला तरी प्रत्यक्ष अनुदान प्राप्तीनंतर सदर तरतुद वाढविता येणे शक्य असल्याने ₹ २ कोटी इतकी प्राथमिक तरतुद केली आहे. सदर अनुदान निधी उपलब्ध करुन घेऊन महापालिका क्षेत्रात विरार सर्व्हे क्र. ३७२ नालासोपारा सर्व्हे क्र. ८, स्मशानभुमी, ३२ अ १, ४११ - गास येथील शासकिय जागा अधिग्रहीत करुन अथवा याकामी उपलब्ध होणाऱ्या अन्य आरक्षणाच्या ठिकाणी अद्यावत कत्तलखाना निर्मितीसाठी ₹ २ कोटी इतकी तरतूद केली आहे.

३५) सुरक्षा व्यवस्था :- रस्त्यावरील फेरीवाले व अतिक्रमण करणाऱ्या व्यक्ती संस्थामुळे नागरिकांना होणारा त्रास व रहदारीला होणारा अडथळा दुर करणे, महानगरपालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण, उद्यान, तलाव इत्यादी ठिकाणी अबालवृध्दांचे संरक्षण तसेच मर्यादित पोलिस यंत्रणा विचारात घेता सामाजिक सुरक्षा व्यवस्था योजनेंतर्गत स्थानिक पोलिस ठाण्यांना सुरक्षा रक्षक पुरवणे, महानगरपालिकेच्या प्रशासकीय व इतर विभागाच्या सुरक्षीततेसाठी हत्यारी व बिनहत्यारी पोलिस कायम स्वरुपी उपलब्ध करणे, रुग्णालय, कार्यालय व मुख्य वर्दळीच्या ठिकाणी व इतर आवश्यक त्या ठिकाणी क्लोज सर्किट कॅमेरा व्यवस्थापन करणे प्रस्तावित आहे.

सुरक्षा साहित्यासाठी ₹ १ कोटी ३५ लक्ष इतकी तरतूद असुन ठेका आस्थापना खर्चांतर्गत नियमीत पोलिस संरक्षणासह सुरक्षा रक्षक ठेका पध्दतीने नेमणे कामी ₹ ७ कोटी ५० लक्ष इतकी तरतूद आहे.

३६) नाले खोदाई :- पावसाळी पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होऊन शहरामधे पाणी तुंबून राहू नये यासाठी नियमीत नाले सफाईसह पावसाळ्यापूर्वी यांत्रिक साहित्याव्दारे नाले खोदाई करणेकामी ₹ ४ कोटी ७९ लक्ष इतकी स्वतंत्र तरतूद केली आहे.

३७) सॅटेलाईट सिटी योजना :- या योजनेतील कामांची किंमत ₹ ५५७ कोटी इतकी असुन सन २०११-१२-१३ मधे सादर केलेल्या प्रस्तावानुसार ₹ २०४ कोटी ८३ लक्ष रक्कमेची कामे मंजूर झाली आहेत. यामधे कचरा उचलण्यासाठी अत्याधुनिक

वाहने खरेदीसह पाणी पुरवठा व मलनिसा:रण, घनकचरा व्यवस्थापन, भुयारी गटार व्यवस्था, प्रस्तावित योजना सुधारणा व अंमलबजावणी क्षमता वाढवणे. मलनिसा:रण केंद्रे चार प्रमुख ठिकाणी तेरा पंप गृहांसह उभारणी करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करुन निरुपद्रवी पाणी समुद्रात खोलवर सोडणे, पावसाळी पाणी सखल भागात भरण्याची समस्या सोडवणे इत्यादी बाबींचा या योजनेत समावेश आहे. यायोजनेमधील निकषांच्या पुर्ततेसाठी मालमत्तांचा/ महानगरपालिका क्षेत्राचा भौगोलिक सर्व्हे, व्दिनोंद लेखापध्दती अंमलबजावणी, संगणकीकरण, इ-गव्हर्नस योजना इत्यादी साठी आवशक तरतुदी आहेत. या योजनेसाठी ₹ १५० कोटी ४५ लक्ष इतकी एकूण तरतूद केली आहे.

३८) पर्यटन क्षेत्र, श्री क्षेत्र व ऐतिहासिक मालमत्तांचे सवंर्धन आणि विकास :- डेस्टिनेशन वसई या पर्यटन स्थळ निर्मितीच्या संकल्पपूर्ती साठी सर्वकष प्रयत्न केले जात असून याद्वारे स्थानिकांना रोजगार उपलब्धीसह शहराचे सौदर्यीकरण होणार आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाने ज्या प्रमाणे न्याहरील व रहिवास योजनेअंतर्गत मान्यता दिली आहे त्याच दृष्टीने पर्यटनास चालना देण्यासाठी आपल्या महानगरातील ज्या व्यक्ती अथवा संस्था न्याहरी व रहिवास योजनेचा लाभ घेऊ इच्छितात त्यांना मदत करणेचा मानस आहे. तसेच सांस्कृतीक वारसा जोपासला जाणार आहे. वसई विरार महानगरपालिका क्षेत्र तिसरी मुंबई म्हणून भौगोलिक स्वरुपात नावारुपाला येत आहे. मुंबई महानगरपालिके खालोखाल व्दितीय क्रमांकाचे भौगोलिक कार्यक्षेत्र असणारी वसई विरार महानगरपालिका आहे. आपल्या जवळ विस्तीर्ण समुद्र किनारा, तुंगारेश्वर सारखे अभय अरण्य, वज्रेश्वरी, सातीवली सारखे गरम पाण्याचे झरे, वैतरणाची विस्तिर्ण खाडी, निर्मळ, गणेशपुरी, जिवदानी मंदिर यासारखी भाविकांची श्रध्दास्थाने, आगाशी येथील जैन मंदिर, वसईतील अनेक पुरातन चर्चेस, नालासोपारा येथील बौध्दस्तूप, वसई व अर्नाळा किल्ला अशी अनेक ठिकाणे असुन यापैकी महानगरपालिका क्षेत्रात येणारी सर्व ठिकाणे योग्य पध्दतीने विकसित करण्याचा संकल्प आहे. पर्यटन विकासाचे क्षेत्र विचारात घेता पर्यटन विकासास चालना देण्यासाठी आकर्षक पध्दतीने जाहिरात करणे, ब्रॅन्ड ॲम्बॅसेडर नेमणे इत्यादी कार्यवाही प्रस्तावित असून पर्यटन क्षेत्र, श्री क्षेत्र व ऐतिहासिक मालमत्तांचे संवर्धन आणि विकासासाठी ₹ १ कोटी ६४

लक्ष इतकी  तरतूद बांधकाम विभागांतर्गत आहे.

३९) त्रयस्थपक्षिय तपासणी खर्चासाठी ₹ ९१ लक्ष तरतुद केली आहे.

४०) आरक्षित जागा ताब्यात घेऊन विकसीत करणेकामी ₹ १५ कोटी इतकी तरतुद केली आहे.

४१) विशेष योजना :- पाणी पुरवठा योजना, रिंगरोड तसेच सॅटेलाईट सिटी योजने व्यतिरीक्त उर्वरीत मलनि:सारण योजना, पर्यटन विकास प्रकल्प इ. जिव्हाळ्याच्या योजना महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजना अनुदान निधीतुन अथवा अल्प व्याज दराने कर्ज निधीतुन पूर्ण करणेचा मानस असुन यासाठी विविध संस्था, शासकीय विभाग यांचे समवेत संपर्क साधून आवश्यक पूर्तता करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेऊन प्रकल्प पूर्ण करणे इ. कामासाठी त्या त्या क्षेत्रातील तांत्रीक सल्लागार नेमणूक निविदा पध्दतीने करणे आवश्यक आहे. प्रकल्प यशस्वीपणे कार्यन्वित करणेसाठी त्यांची नियुक्ती फायदेशीर ठरणार असल्याने कर्ज निधी खात्याकडे महानगरपालिका अंशदान वर्ग करुन त्यामधून सल्लागार नेमणूकीसह इतर अनुषंगीक खर्चासाठी ₹ १२ कोटी ५५ लक्ष इतकी प्राथमिक तरतुद केली आहे. तव्दतच विशेष योजनांसाठी कर्ज परतफेड व महानगरपालिका हिश्यासाठी ₹ २ कोटी २० लक्ष इतकी तरतुद केली आहे.

४२)पाणी पुरवठा, रिंगरोड व इतर योजनांसाठी ₹ १०६० कोटी इतके कर्ज अपेक्षित असून प्रथम टप्यात ₹ १०६ कोटी कर्ज प्रत्यक्ष प्राप्तीनंतर अतिरीक्त तरतुदीव्दारे जमा खर्च  दर्शवणेचे प्रस्तावित आहे. तथापी यासाठी योजना खर्चानुसार यथाप्रमाण महानगरपालिका हिस्सा व अतिरीक्त कर्ज परतफेडीसाठी खालीलप्रमाणे तरतुद केली आहे.

| शिर्ष | रिंगरोड प्रकल्प | पाणीपुरवठा योजना | रेल्वे उड्डाणपूल | इतर प्रकल्प |
|---|---|---|---|---|
| कर्ज परतफेड तरतुद | ₹ १२ कोटी २० लक्ष | ₹ रु१४ कोटी २६ लक्ष | ₹ २५ लक्ष | ₹ २० लक्ष |
| महानगरपालिकेचा खर्चातील हिस्सा | ₹ २२ कोटी | ₹ ९० कोटी | ₹ ३६ लक्ष | ₹ २ कोटी |
| एकूण | ₹ ३४ कोटी २० लक्ष | ₹ १०४ कोटी २६ लक्ष | ₹ ६१ लक्ष | ₹ २ कोटी २० लक्ष |

प्राथमिक दृष्टीक्षेपातील योजना खालील प्रमाणे आहेत

★ उर्वरीत भूमिगत मलनि:सारण योजना = ₹ ४६० कोटी

★ कवडास, धामणी, खडकोली, राजीवली, सातीवली, कामण, तिल्हेर, देहरजा,

वैतरणा इ. इतर नवीन जल उद्भव विकास = ₹ ३५० कोटी

★ एकात्मिक किनारपट्टी विकास व पर्यावरण संवर्धन योजना = ₹ ३५० कोटी

★ आर्थिक दुर्बल घटकांसाठी व अल्प उत्पन्न गटासाठी गृहनिर्माण योजना व पायाभूत सुविधा विकास प्रकल्प = ₹ २५० कोटी

★ एकात्मिक पर्जन्य वाहिन्या विकास प्रकल्प = ₹ ५५० कोटी

★ घनकचरा व्यवस्थापन व क्षेपण भूमीविकास प्रकल्प = ₹ ५ कोटी

★ डेस्टिनेशन वसई या उपक्रमा अंतर्गत पर्यटन विकास प्रकल्प = ₹ २०० कोटी

★ शासकीय सुधारणा व उत्पन्न वृध्दी अंमलबजावणी प्रकल्प = ₹ १०० कोटी

★ विद्युत विभागाची विविध विकास कामे, विद्युत ऊर्जा बचतीचे प्रकल्प राबवणे, कार्बनक्रेडीट मिळवणे, विद्युत व्यवस्था आराखडे तयार करणे = ₹ १ कोटी

सदर अर्थसंकल्प तयार करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, यांचे मौलीक मार्गदर्शन तसेच मा. सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, मा. गटनेते, मा. स्थायी समिती सदस्य, सर्व प्रभाग समित्यांचे सन्मा. सभापती, महिला बाल कल्याण समिती सभापती, मा. आयुक्त, मा. अतिरीक्त आयुक्त, व इतर अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याची मी जाणीवपूर्वक नोंद घेत आहे.

आपल्या कामातून "बहुजन विकास हाच प्रगतीचा प्रकाश" हे पालिकेचे ब्रिदवाक्य सार्थ करण्यासाठी आपण सदैव प्रयत्न करू याची मला खात्री आहे. त्यासाठी मा. स्थायी समितीने सादर केलेला हा अर्थसंकल्प मंजुर करणेस माझी विनंती आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे यांनी वेळोवेळी आपल्याला सहकार्य केले आहे. त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. मा. स्थायी समितीने मंजुर केलेला हा अर्थसंकल्प मी आपणासमोर सादर केला असुन ही संधी मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. प्रथम महापौर साहेब, मा. प्रथम उपमहापौर साहेब, मा. महापौर साहेब, मा. उपमहापौर साहेब, सर्व पदाधिकारी, माझे

मा. स्थायी समितीतील सर्व सहकारी तसेच माझ्या पक्षातील सर्व सन्मा. सदस्य व कार्यकर्ते यांनी दिली याबद्दल मी सर्वांचा सदैव ऋणी राहीन.

धन्यवाद !

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

आपला,

(अजीव पाटील)

सभापती

स्थायी समिती

वसई - विरार शहर महानगरपालिका

प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास
वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००१